# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 23/12/2019 (सोमवार)
# (सकाळ)

---

## घरफोडीचा प्रयत्न

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावर लक्ष्मी नगर, काटोल येथे दिनांक 22/12/2019 चे 01.20 वा. ते 01.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गोपिचंद यादवराव कठाने, वय 52 वर्ष, रा. लक्ष्मी नगर, काटोल यांचा किरायदार नामे– घनशाम रामराव ढोले हे बाहेर गावी गेलेले असतांना फिर्यादींना किरायदारचे रुमचे दाराचे कुलुप तुटलेले दिसले. फिर्यादींनी रूमची पाहणी केली असता तेथे एक लोखंडी कटोनी पडलेली दिसली म्हणुन फिर्यादीने किरायदार यास फोन करुन बोलावले व घराची पाहनी केली असता काहीही चोरीला गेलेले नाही परंतु किरायदारचे रुमला लावलेले कुलूप तोडलेले असुन, अज्ञात आरोपीने चोरीचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ चव्हाण हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा जयपुरकर लेआउट कोंढाळी येथे दिनांक 21/12/2019 चे 12.00 वा. ते 17.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– स्वप्निल सुभाशराव पुरी, वय 23 वर्ष, रा. वार्ड क्र.1 जयपुरकर ले–आउट कोंढाळी यांच्या घराच्या मागील दाराचा कोंडा अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने फिर्यादीच्या घराच्या बेडरूम मधील कपाटात ठेवलेले नगदी 10,000/–रू. व सोन्याचे झुमके किंमती 16,000/–रू. असा एकुण कि. 26,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार पुरूषोत्तम धोंडे हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 25 कि. मी. अंतरावर खापरी राजा वडेगाव काळे शिवार येथे दिनांक 21/12/2019 चे 18.00 वा. ते दिनांक 22/12/2019 चे 12.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गुणवंता गंगारामजी भोयर, वय 46 वर्ष, रा. खापरी राजा यांच्या शेत शिवारातुन इलेक्ट्रीक स्वीच बॉस ते विहीर व बोअरवेल पर्यंत गेलेला फलोटेक कंपनीचा केबल वायर अंदाजे 300 मिटर असा एकुण 300 मिटर केबल वायर किंमती 35,000/–रू. चा मुद्देमाल संशयीत आरोपी नामे– रमेश शिरपत कापसे, वय 40 वर्ष, रा. खापरी राजा याने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार विजय कुंमरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर